

# अहंभाव

# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

मार्च २०२६

वर्ष ५१ अंक ०३



श्रीमाताजी

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

आपल्याला काय प्रदान करण्यात आलेले आहे, याची जिवात्म्याला जाणीव असते आणि तो असीम कृतज्ञतेमध्ये निवास करत असतो. पण अहंकार मात्र सतत त्याला स्वतःला काय हवे–नको याचाच विचार करत असतो. अहंकार सदान्‌कदा त्या विचारांनीच व्याप्त असतो.

– श्रीमाताजी (CWM 14 : 257)

*

# अहंभाव

संपादकीय........................................................०२
अहंभावाचे आणि अहंकाराचे स्वरूप..................................०३
अहंभावाचे प्रयोजन?...............................................११
अहंभावाचा निरास..................................................२३
अहंभावातीत जीवन.................................................३२
विचारकणिका......................................................३८

---

## संपादकीय

अहंभाव हे प्रकृतीचे एक अतिशय चमत्कृतिपूर्ण साधन आहे. अहंभावामुळे आपल्याला 'मी'ची जाणीव होते. मनाच्या उदयाबरोबर अहंभावाचा उदय होतो आणि त्याच्या बरोबरच एक प्रकारचे विभक्तपण निर्माण होते. मात्र मनाच्या अतीत असणाऱ्या आत्मतत्त्वाचा शोध लागल्यानंतर हा अहंभाव लोप पावतो.

अध्यात्म–जीवनामध्ये या अहंकडे नेहमीच एक अडथळा म्हणून पाहिले गेले आहे. पण श्रीमाताजींनी मात्र या अहंचे विश्वरचनेमधील स्थान विशद केले आहे. अहंचे स्वरूप, त्याचा उपयोग, अहंचा अडथळा केव्हा होतो, अहंकाराचा निरास कसा करावा इत्यादी विविध मुद्द्यांचा समावेश 'अभीप्सा' मासिकाच्या या अंकात करण्यात आला आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# अहंभावाचे आणि अहंकाराचे स्वरूप

## अहंचे स्वरूप

साधक : अहं म्हणजे काय?

श्रीमाताजी : माझ्या मते, अहं ही अशी एक गोष्ट आहे की ज्यामुळे प्रत्येक व्यक्ती, सर्व शक्य प्रकारे एक स्वतंत्र अस्तित्व बनते. इतरांपासून आपण वेगळे अस्तित्व आहोत ही भावना अहंमुळे निर्माण होते.

''मी,'' ''मी आहे,'' ''मला अमुक एक गोष्ट हवी आहे,'' ''मी हे करतो,'' ''मी जिवंत आहे,'' ही सर्व जाणीव निश्चितपणे अहंमुळे निर्माण होते. इतकंच काय, पण ''मी विचार करतो म्हणून मी आहे,'' हे अगदी प्रसिद्ध वचन आहे. माफ करा; पण मला वाटते की, खरंतर हा निव्वळ मूर्खपणा आहे. पण या मूर्खपणाचा खूप उदोउदो करण्यात आलेला आहे. हा सुद्धा एक प्रकारचा अहंकारच आहे.

तुम्ही अमुक एक व्यक्ती आहात आणि तुम्ही याच्यापासून किंवा त्याच्यापासून पूर्णपणे वेगळे आहात हे तुम्हाला अहं-जाणिवेमुळे समजते. आणि या जाणिवेमुळेच तुमचा देह इतरांमध्ये विरघळून जात नाही. म्हणजे तो देह अहंमुळेच शारीरिक स्पंदनांच्या एका सामुदायिक समूहामध्ये विरघळून जात नाही. अहंमुळे तुम्हाला एक निश्चित आकार, निश्चित व्यक्तिमत्त्व, एक स्वतंत्र चेतना प्राप्त होते. तुम्ही स्वतः इतरापांसून स्वतंत्रपणे अस्तित्वात आहात, अशी काहीशी ती जाणीव असते. म्हणजे तुम्ही फारसा काही विचार केला नाहीत तरीसुद्धा, सहजस्वाभाविकपणे तुम्हाला अशी जाणीव असते की, अगदी सर्व जग जरी नाहीसे झाले तरीही तुम्ही अस्तित्वात राहणार आहात, तुम्ही जसे आहात तसेच व्यक्ती म्हणून अस्तित्वात राहणार आहात. अर्थातच हा आत्यंतिक अहंकार असतो.

(स्वतंत्र अशा व्यक्तिमत्त्वाची घडण होण्यापूर्वी व्यक्ती ही समूहाचा केवळ एक अंशभाग असते.) व्यक्ती अपरिपक्व असताना अहं जर नाहीसा

झाला तर ती व्यक्ती निश्चितपणे, प्राणिक आणि मानसिक दृष्टिकोनातून पुन्हा एकदा आधीप्रमाणेच एक आकारहीन गोळा असल्यासारखी होईल.

अहं हा निश्चितपणे व्यक्तीकरणाचे साधन असतो. म्हणजे जोपर्यंत व्यक्तीची एक स्वतंत्र, पृथगात्म अस्तित्व म्हणून घडण होत नाही तोपर्यंत अहं हा एक अगदी आवश्यक असा घटक असतो. जर एखादी व्यक्ती अपरिपक्व असतानाच स्वतःचा अहं नष्ट करू शकली तर, ती व्यक्ती स्वतःची व्यक्तिगतता गमावून बसेल. मात्र एकदा पृथगात्मकतेची घडण झाली की मग, हा अहं निरुपयोगी ठरतो. एवढेच नव्हे तर तो घातकसुद्धा ठरतो. मग त्यावेळी मात्र तो नष्ट करावाच लागतो. पण अर्थातच, तुमची घडण करण्यासाठी त्या अहंने खूप खस्ता खाल्लेल्या असतात आणि त्यामुळे तो इतका सहजासहजी नाहीसा होण्यास राजी होत नाही. त्याने केलेल्या कष्टांचे फळ त्याला मिळावे अशी त्याची अपेक्षा असते; म्हणजेच त्याला स्वतःच्या पृथगात्मकतेचा (individuality) आनंद लुटायचा असतो.

– श्रीमाताजी (CWM 07 : 11-12)

*

## अहं आणि अहंकार

अहंकारामध्ये (egoism) सुधारणा करणे तुलनेने सोपे असते कारण अहंकाराची जाणीव प्रत्येकाला असते. स्वतःमधील अहंकाराचा शोध लागावा अशी जर व्यक्तीची इच्छा असेल आणि तसा तिचा निर्धार असेल तर, त्या अहंकाराचा शोध लागणे सोपे असते; त्याच्यामध्ये सुधारणा करणे सोपे जाते.

पण त्याच्या तुलनेत, अहं (ego) हाती लागणे हे कितीतरी अधिक अवघड असते. कारण, अहं म्हणजे काय हे कळण्यासाठी व्यक्ती आधी अहंच्या पलीकडे गेलेली असणे आवश्यक असते, अन्यथा तिला अहं म्हणजे काय आहे याचा शोध लागणे शक्य नसते. कारण तुमची घडणच अहंमधून झालेली असते. नखशिखांत, बाहेरपासून ते अगदी

अंतरंगापर्यंत, शरीरापासून ते आत्मिक गोष्टीपर्यंत, तुम्ही अहंमध्ये आकंठ बुडालेले असता. अहं प्रत्येक गोष्टीमध्येच मिसळलेला असतो आणि तो काय आहे याची तुम्हाला यत्किंचितही जाणीव नसते. अहं काय आहे हे कळण्यासाठी, तुमच्यामध्ये कोठेतरी अगदी  अंशतः का होईना, छोट्याशा कोपऱ्यात का होईना, पण तुम्ही त्यापासून मुक्त होणे आवश्यक असते, म्हणजे तुम्ही त्यापासून दूर झालेले असणे आवश्यक असते किंवा त्यासाठी तुम्ही त्याच्यावर विजय प्राप्त केलेला असणे आवश्यक असते.

तुम्हाला पृथगात्म (individualise) व्यक्ती बनविण्यासाठी हा अहं साहाय्य करतो आणि तोच अहं तुम्हाला ईश्वर होण्यापासून मज्जाव करतो. या दोन्ही गोष्टींचा एकत्रित विचार करा म्हणजे मग तुम्हाला अहं काय आहे ते कळून येईल. या जगाची अशी व्यवस्था आहे की, त्या व्यवस्थेमध्ये अहं नसेल तर व्यक्तीला व्यक्तीविशिष्टताच येणार नाही, व्यक्तीची पृथगात्मताच राहणार नाही (म्हणून अहं आवश्यक आहे.) मात्र अहं आहे तोपर्यंत हे जग दिव्य बनू शकत नाही. त्यामुळे असा तर्कसंगत निष्कर्ष निघतो की, ''आपण आधी सचेत व्यक्ती होऊ या आणि मग आपण आपल्यामधून अहं हद्दपार करू या आणि आपण ईश्वर बनू या.'' अहंच्या अस्तित्वाची जाणीव होण्यासाठीसुद्धा बरेच कष्ट घ्यावे लागतात.

अहंकार म्हणजे काय याची प्रत्येकाला जाणीव असते. व्यक्ती जेव्हा सर्व गोष्टी स्वतःकडे ओढून घेऊ इच्छित असते आणि इतर व्यक्तींमध्ये तिला स्वारस्य वाटत नसते, तेव्हा त्या गोष्टीला 'अहंकार' असे म्हणतात. जेव्हा तुम्ही स्वतःला विश्वाच्या केंद्रस्थानी ठेवता आणि इतर सर्व गोष्टी या जणू तुमच्यासाठीच अस्तित्वात आहेत, असे तुम्हाला वाटत असते तेव्हा तो अहंकार असतो. आणि तो अगदी स्पष्टपणे दिसतो. एखादा माणूस अहंकारी आहे हे जर एखाद्या व्यक्तीला ओळखता आले नाही तर, ती व्यक्ती अंध आहे असेच म्हटले पाहिजे.

प्रत्येक जणच कमीअधिक प्रमाणात अहंकारी असतो. आणि थोड्या

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

## तुमचा उद्योगव्यवसाय मी सांभाळीन...

श्रीअरविंद आश्रमाच्या दिल्ली शाखेचे संस्थापक श्री. सुरेन्द्रनाथ जौहर; त्यांचे अनेक उद्योग-व्यवसाय होते. कोळशाची खरेदी आणि त्याचे वितरण हा देखील त्यांचा एक उद्योग होता. एकदा कोळशाची खाण खरेदी करण्यासाठीचा एक चांगला प्रस्ताव सुरेन्द्रनाथ यांच्याकडे आला. त्यांनी त्यावर बराच अभ्यास केला, कागदपत्रं तयार केली, माहितीची जुळवाजुळव केली, संबंधित लोकांशी बऱ्याच बैठका झाल्या आणि खाण खरेदी करण्यापूर्वी हा प्रस्ताव एकदा श्रीमाताजींना दाखवावा आणि त्यांचे शुभाशीर्वाद घ्यावेत या हेतुने ते श्रीमाताजींपाशी सर्व कागदपत्रे घेऊन गेले. मला यासंबंधी तुमच्याशी बोलायचे आहे, असे ते म्हणाले मात्र, श्रीमाताजी उत्स्फूर्तपणे उद्गारल्या, ''नाही, ही खाण खरेदी करू नका.''

ते श्रीमाताजींना म्हणाले, ''आपले मागे बोलणे झाले होते त्याप्रमाणे आता माझ्या 'सुंदरसन आणि कंपनी'चा सर्व कारभार तुम्ही सांभाळणार आहात, हे मला मान्य आहे. पण तुम्ही असा कारभार सांभाळणार? तुम्ही तर अजून कागदपत्रंही पाहिली नाहीत आणि त्या आधीच तुम्ही 'नाही' म्हणत आहात?'' श्रीमाताजी म्हणाल्या, ''ती माझी पद्धत आहे. आणि तुम्ही जर दिव्य शक्तीला समर्पित झालात तर तुम्हाला सुद्धा ही पद्धत अवलंबता येईल.''

नंतर श्रीमाताजी कोळसा व्यवसायातल्या सर्व बारीकसारीक तपशिलांचा उल्लेख करत बोलत होत्या. सुरेन्द्रनाथ थक्क होऊन त्यांच्याकडे पाहतच राहिले. कोळशाची खाण खरेदी करायची नाही हा निर्णय तर झालाच होता, पण आत्तापर्यंत इतके महिने त्या लोकांबरोबर ज्या वाटाघाटी चाललेल्या होत्या त्या लोकांना आता तोंड कसे द्यायचे या विचाराने सुरेन्द्रनाथ हतबुद्ध झाले. स्वतःच्या अहंला मुरड घालून, संबंधितांशी बोलणे हे खरोखरच अवघड होते. पण श्रीमाताजींप्रति समर्पित असलेल्या सुरेन्द्रनाथ यांनी ते साध्य केले. कालांतराने श्रीमाताजींनी अलगदपणे सुरेन्द्रनाथांची जबाबदारी सुरेन्द्रनाथांच्या मुलावर सोपविली. त्यामुळे सुरेन्द्रनाथ पुढे पूर्ववेळ 'श्रीअरविंद-कार्य' करू शकले.

(My Mother by Surendra Nath Jauhar : 114-115)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### ०१ जानेवारी २००९

येणारे हे वर्ष प्रगती आणि रूपांतरणाचे वर्ष ठरू दे. दिव्य साक्षात्काराच्या मार्गावर पडलेले ते एक पुढचे पाऊल ठरू दे.

– श्रीमाताजी (CWM 15 : 199)

*

### २१ फेब्रुवारी २००९

तुम्ही परमेश्वर आणि दिव्य माता यांच्या नजरेखाली आहात ही जाणीव ठेवूनच नेहमी जीवन जगा. 'दिव्य उपस्थिती'ला अपात्र ठरेल असे काही करू नका, तसा विचार करण्याचा किंवा तशा भावना बाळगण्याचा प्रयत्नदेखील करू नका.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 172)

*

### ०४ एप्रिल २००९

श्रीअरविंद चार एप्रिलला पाँडिचेरी येथे वास्तव्यास आले त्यामुळे चार एप्रिल हा श्रीअरविंद आश्रमाचा नववर्ष दिन आहे.

– श्रीमाताजी (CWM 13 : 105)

*

### २४ एप्रिल २००९

हे दिव्य माते, मला शांती दे.
माझ्या मनाला शांती लाभू दे,
माझ्या भावना शांतशांत होऊ देत,
माझ्या संवेदना प्रशांत होऊ देत,
परिपूर्ण श्रद्धेमधून येणारी शांती मला प्रदान कर.
शांती, शांती, शांती!!

– श्रीमाताजी

*